11829

<u>अतितात्काळ/कालमर्यादा</u>

क्रमांक.पोअवा/आस्थालि/बॉडीमास/ /२०१९.
कार्यालय, पोलीस अधीक्षक, वाशिम
वाशिम, दिनांक 19 AUG 2019

**विषय :— पोलीस बलातील विहीत शारिरिक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी <u>(पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील)</u> यांच्यासाठी प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याबाबत.**

—०००—

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, पोलीस बलातील विहीत शारिरिक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील) यांच्यासाठी प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याबाबत शासन आदेश असून ही योजना सर्वस्वी ऐच्छिक स्वरुपाची आहे. त्या अनुषंगाने या योजनेचा लाभ आपल्या पोलीस स्टेशन/शाखा/पोलीस मुख्यालयातील **ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या संवर्गातील)यांना घ्यावयाचा आहे व ज्यांचे वय दिनांक ३१.१२.२०१८ रोजी ३० वर्ष पूर्ण किंवा त्याहून अधिक आहे.** अशा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून ''ते सदर योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असल्याबाबत'' त्यांनी **"मॉ गंगा मेमोरिअल, बाहेती हॉस्पीटल, वाशिम"** येथे **<u>दिनांक १२/०८/२०१९ ते दिनांक १८/०८/२०१९ पर्यन्त सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत</u> उपस्थित राहून बॉडीमास इंडक्सबाबत वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. सदरचे प्रमाणपत्र नेमणुकीचे ठिकाणी जमा करावयात.**

२/— त्याचप्रमाणे सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे जन्मतारखेचा/वयाचा तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ते ३० वर्ष वयाची अट पूर्ण करीत आहे. याबाबतचा पुरावा करीता आपले आयकार्ड सोबत घेवुन जातील. तसेच जे पोलीस अधीकारी/कर्मचारी जे दिनांक १२/०८/२०१९ ते दिनांक १८/०८/२०१९ पावेतो प्रोत्साहन भत्ता करीता उपस्थित राहणार नाही. त्यांना सदर योजनेच्या लाभासाठी त्यांचा विचार केला जाणार नाही. याची सर्व अधिकारी /कर्मचारी यांना समज द्यावी. तसेच जे अधिकारी/कर्मचारी अर्जित रजेवर/ सिक मध्ये असतील त्यांना कळवून तशी नोंद स्टे.डायरी मध्ये घेण्यात यावी. ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी मुदतीचे आंत बॉडी मॉस इंडेक्स मुदतीचे आंत न केल्यास त्यांचा प्रोत्साहन भत्ता करीता विचार केला जाणार नाही. अशा अधिकारी कर्मचा—यांचे प्रमाणपत्र मुदत संपल्यानंतर या कार्यालयास पाठविण्यात येवु नये याची नोंद घ्यावी.

३/— तसेच सर्व ठाणेदार / सर्व शाखा / राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांनी पोलीस अधिकारी/ कर्मचा—यांचे बॉडी मॉस इंडेक्स चे प्रमाणपत्र एकत्रित रित्याने दिनांक २०/०८/२०१९ पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावे. या बाबतची सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात यावी व संध्याकाळी/रात्रीचे गणनेवर दयावी तशी नोंद स्टे.डायरी मध्ये घेण्यात यावी.

( वसंत परदेशी )
भा.पो.से.,
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

उपविभागीय पोलीस अधीकारी, वाशिम/मंगरूळपीर/कारंजा/ठाणेदार,वाशिम शहर/वाशिम ग्रामीण/मालेगांव/शिरपुर/ रिसोड/मंगरूळपीर/आसेगांव/अनसिंग/जउळका/कारंजाशहर/कारंजा ग्रामीण/मानोरा/धनज/प्रभारी अधिकारी, शवाशा/जिवाशा/ स्थागुशा/जिवीशा /पोअ.,वाचक शाखा/अपोअ.,वाचक शाखा/मोपवि/मसुप/अमानी/बीडीडीएस/कल्याण शाखा/नियंत्रणकक्ष/श्वान पथक/ बिनतारी संदेश/नाहसं.,पथक/आर्थीक गुन्हे शाखा/रापोनि., पोलीस मुख्यालय, वाशिम.

प्रत :— संगणक कक्ष /डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय, वाशिम.

२/— संगणक कक्ष यांनी सदरचे ज्ञापन सर्वा करीता पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वाकरीता उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा/रापोनि.,पो.मु.,वाशिम यांना त्वरीत ''ई—मेल'' द्वारे कळवावे.

प्रत माहितीस :—

डॉ.हरीश बाहेती मॉ गंगा मेमोरिअल, बाहेती हॉस्पीटल, वाशिम.

२/— आपणास कळविण्यात येते की, आपल्याकडे येणा—या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे नांव/पदनाम व बक्कल क्रमांक ची ओळख त्यांचे ओळख पत्रानुसार करुनच त्यांची उंची/वजन मोजुन वैद्यक शास्त्रानुसार विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे तपासणी करून सदरची यादी बक्कल क्रमांक अनुक्रमणीका नुसार यादी या कार्यालयास पाठविण्यास विनंती आहे.